**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि. ०५ मार्च २०२३**

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ८८/२०२३ भादंविसक ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ११/०२/२०२३ रोजी २३.०० वा ते दि १२/०२/२०२३ रोजी पहाटे ०५.०० वा चे दरम्यान, सोलापूर मार्केट यार्ड येथे भारत फव्हार मार्ट या दुकानाजवळ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०५/०३/२०२३ रोजी ०७.१२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुहास अर्जुन खैरे, वय- ३५ वर्षे, रा. कव्हेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १८,०००/- रु एक हिरो होंडा कंपनीची मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच १३ ए बी ८१३९ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करुन पार्क केली असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने कशाचे तरी सहाय्याने लॉक उघडुन, अगर डयुप्लीकेट चावीचा वापर करुन, फिर्यादीचे संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ६०२ राठोड - ९८९०९३५४९२ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १२०/२०२३ भादंविसक ३२४,३२३,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०४/०३/२०२३ रोजी २३.०५ वा चे सुमारास, जुना बस डेपो मैदान, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०५/०३/२०२३ रोजी ११.५० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुरज नामदेव गायकवाड, वय- २४ वर्षे, रा. रमाबाई आंबेडर नगर, मातोश्री चौक, न्यु बुधवार पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) कुणाल कांबळे, २) अभिजीत कांबळे, |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचा भाऊ ऋजिक याने भांडण चालु असल्याचे फोनवर कळविल्याने फिर्यादी हे जुना बस डेपो मैदान येथे भांडण सोडविणेस गेले असताना, वरील आरोपीतांनी फिर्यादीचे भावास लाथाबुक्याने मारहाण केली आहे. तसेच फिर्यादीस ही लाथाबुक्यांनी, हाताने मारहाण करुन त्यानंतर आरोपीत क्रं. १ याने दगडाने व आरोपीत क्रं. २ याने त्याचे हातातील कडयाने मारहाण करुन जखमी केले आहे म्हणून. तपास:- सफौ/ थोरात - ९९२३१९११५६ |